## तिच्यामुळे पुनर्जन्म

सत्तर वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्यावेळी आमची किर्लोस्करवाडी म्हणजे माळावर असलेल्या छोट्याशा कारखान्याची अगदीच लहान वसाहत होती. नव्हते तिथे विजेचे दिवे की नव्हता औषधांनी सज्ज असा मोठा दवाखाना! अशा परिस्थितीत माझ्या आईला सातव्या महिन्यातच एकाएकी प्रसूतीवेदना सुरू झाल्या. स्वाभाविकच कुटुंबीय मंडळींची धांदल उडाली. मने सचिंत झाली. यथाकाल आई प्रसूत झाली. कन्या जन्माला आली. काळीबेंद्री आणि कमालीची अशक्त अशी. आमचे डॉक्टर वडिलांच्या चांगल्या ओळखीचे. ते आले. मुलीला पाहून ते आईला म्हणाले, "काय मुक्ताबाई, डोंगर पोखरून उंदीर काढलास हा! तुझी ही अपुऱ्या दिवसांची कन्या म्हणजे सुदाम्याची बहीण शोभेल अशी आहे खरी!" माझी आई चांगली देखणी, गोरी, सुदृढ होती. डॉक्टरांच्या बोलण्यावर ती फक्त हसली. त्यांच्या शेजारीच एक प्रौढ प्रसन्न चेहऱ्याची स्त्री उभी होती. आईचा निरोप घेऊन जाताना डॉक्टर त्या स्त्रीकडे वळून अगदी हळूऽऽ आवाजात म्हणाले, "तास-दोन तासापेक्षा ही मुलगी जास्त वेळ काढील असे मला वाटत नाही. रडणेही अगदी मुळूमुळू आवाजात येत आहे. हिचा सर्व भार परमेश्वरावर. तो काय करील ते खरे!" जरा वेळाने त्या मुलीचा आवाज अधिकच क्षीण येऊ लागला. तेव्हा मात्र त्या स्त्रीला राहवेना. ती लगबगीने घरात गेली. तिने चुलीवर पाणी गरम केले. ते बाटल्यात भरले. आणि त्या निःशक्त मुलीला कापसात, दुपट्यात गुंडाळून तिने तिला एका सुपात ठेवले व भोवती त्या बाटल्या ठेवून त्या बाळजीवाला ती हळूहळू शेकू लागली. त्या पाण्याची अन् त्या स्त्रीच्या मायाळू स्पर्शाची ही ऊब त्या कोवळ्या जिवाला जाणवली असावी. तो जीव जरा सुखावला. किंचित मोठ्याने हुंकार देऊ लागला. थोडी चुळबुळ करू लागला तशी त्या स्त्रीची आशा थोडी पल्लवित झाली. हाच प्रयोग ती काही वेळ करीत राहिली. कदाचित काही दिवसही असेल. त्या जरत्कारू मुलीला थंडीची बाधा फार झटकन होत असे. आणि ते दुखणे न्युमोनियावर जाऊन ती साऱ्यांच्या जिवाला घोर लावीत असे. वर्ष-सहा महिने गेले.त्या प्रौढ स्त्रीचे या मुलीवर बारीक लक्ष असे. माझी आई नेहमी त्या मुलीच्या काळजीत असे. तिला ही धीर देई. मुलगी दिवसमासाने वाढू लागली. तिच्या जगण्याबद्दलची सर्वांची आशाही वाढू लागली. ती साऱ्यांना काळजी लावणारी अशक्त मुलगी म्हणजे मी मालती किर्लोस्कर आणि डोळ्यात तेल घालून मला जपणारी ती स्त्री म्हणजे माझी सख्खी आतेकाकी - गंगाबाई जांभेकर. मी तिलाच 'आई' म्हणून हाक मारीत असे. माझ्या जन्मदात्या आईला मी 'नन्नी' म्हणायची. ती माझी आतेकाकी फार दयाळू, परोपकारी, उत्तम लेखिका व समाजसुधारक होती.

अशी वर्षे गेली. माझ्या पदवी परीक्षेचा निकाल लागला. त्यात मला भरघोस यश लाभले. वाडीकरांना त्याचा कोण आनंद झाला! त्यांनी आईच्याच अध्यक्षतेखाली माझा सत्कार योजिला. ती भाषण करायला उभी राहिली आणि तिचा गळा एकदम दाटून आला. ती म्हणाली " बधुभगिनींनो, मालूताईच्या जन्माचा सारा प्रसंग मला अज आठवतोय. आणि तीच का ही आता उंचनिंच झालेली मुलगी असे मनात येऊन माझा विश्वास बसत नाही आहे." असे म्हणून तिने माझ्या जन्माची सारी हकीकत सांगितली आणि बक्षिसाची वस्तू माझ्या हातात ठेवली. मी तिला वाकून नमस्कार केला. तो प्रसंग आजही माझ्या डोळ्यापुढे उभा आहे. माझी आई आज या जगात नाही. पण आज माझ्या आयुष्याच्या कलत्या सायंकाळी जेव्हा जेव्हा मला तिची आठवण येते तेव्हा तेव्हा वाटते साक्षात डॉक्टरांनी माझी आशा पूर्णतः सोडून दिली असतानाही माझी आई पुढे आली नसती, मायेने तिने माझ्यावर उपचार केले नसते तर हे जग कधीतरी मला दिसले असते का? आणि मग तिच्या उपकारांनी माझे मन कृतज्ञतेने भरून येते नि डोळे भिजून जातात.